| | | |
|---|---|---|
| MHST140024882025 | दाखल तारीख | ०७.११.२०२५ |
| | नोंदणी तारीख | १७.११.२०२५ |
| | निकाल तारीख | १२.०८.२०२६ |
| | कालावधी | वर्षे महिना दिवस<br>०० ०९ ०५ |

**भाग अ**

**फलटण येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.३) यांचे न्यायालयात**

(पिठासिन अधिकारी–ए.एस.साटोटे)

**नियमीत फौजदारी खटला क्र.४५८/२०२५**

**निशाणी क्र.२०**

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>लोणंद पोलीस स्टेशन. |
| तर्फे विधीज्ञ | श्रीमती एस.एन.वायकर |
| | विरुध्द |
| आरोपी | विवेक नंदकुमार गार्डे,<br>वय–२९ वर्षे, धंदा–मजुरी,<br>रा. कापशी, ता.फलटण, जि.सातारा |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री.डी.के.अभंग |

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २३.०३.२०२५ |
| पहिली खबर | २४.०३.२०२५ |
| दोषारोपपत्र दिनांक | २९.१०.२०२५ |
| दोषारोप निश्चीत दिनांक | ३०.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २२.०४.२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाकरीता निश्चीत केल्याचा दिनांक | १२.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १२.०८.२०२६ |
| शिक्षेचा दिनांक असल्यास | ....... |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षेचा तपशिल | कलम ४२८ फौ.प्र.संहितेच्या अनुषंगाने सम परिक्षेदरम्यान कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विवेक नंदकुमार गार्डे | २४.०३.२५ | ०५.०५.२५ | भा.न्याय संहिता कलम ११९(१) | निर्दोष | .... | .... |

## <u>भाग क</u>

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| १ | राजश्री नंदकुमार गार्डे | साक्षीदार |
| २ | नितीन बापुराव जाधव | पंच |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार असल्यास–

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## क. न्यायालयातर्फे साक्षीदार असल्यास–

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा तपशिल** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

## अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | १७ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | १८ | निवेदन पंचनामा |
| ३ | १९ | जप्ती पंचनामा |

## ब. आरोपीतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | एम.आर.नं. ५८/२०२५ | एक २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे पदक व काळे मनी असलेले सोन्याचे पट्टीतील मंगळसुत्र |

# <u>न्या य नि र्ण य</u>

(घोषीत दिनांकः १२.०८.२०२६)

आरोपीविरुध्द सदरचा खटला हा भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११९(१) अन्वये चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

२. फिर्यादी नंदकुमार महादेव गार्डे यांनी दि.२४.०३.२०२५ रोजी लोणंद पोलीस ठाणेत फिर्याद दाखल केली की, दिनांक २३.०३.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मौजे कापशी, ता. फलटण गावचे हद्दीत फिर्यादीचे राहते घरात आरोपीला दारु पिण्याकरीता पैसे दिले नाहीत म्हणून त्याने फिर्यादी व त्यांची पत्नी राजश्री नंदकुमार गार्डे यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्यांच्या पत्नीच्या गळयातील र.रु.१,६०,०००/– किंमतीचे २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे पदक व काळे मनी असलेले सोन्याचे पट्टीतील मंगळसुत्र जबरदस्तीने काढून नेले. म्हणून आरोपीविरुध्द फिर्यादीने घडलेल्या घटनेची तक्रार लोणंद पोलीस स्टेशन येथे दिली.

३. वर नमूद फिर्यादवरुन लोणंद पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा रजि. नं.१०६/२०२५ हा भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११९(१) अन्वये दाखल केला. आरोपीविरुध्द वर नमूद कलमांतर्गत दोषारोप नि.क्र.८ निश्चीत करण्यात आला. आरोपीने दोषारोप नाकबुल केला व संपरिक्षेची मागणी केली. सरकार पक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपीविरुध्द पुरावा न आलेने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदविले नाही. तसा आदेश नि.क्र.१ खाली पारीत केला आहे.

४. एकंदर संचिकेतील कागदपत्रे व पुरावा बघता, खालीलप्रमाणे मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी काढण्यात येतात. मी त्यावरील उत्तरे कारणांसहित खालील प्रमाणे दिली आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | फिर्यादी हे सिद्ध करतो काय की, दिनांक २३.०३.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मौजे कापशी, ता. फलटण गावचे हद्दीत फिर्यादीचे राहते घरात आरोपीला दारु पिण्याकरीता पैसे दिले नाहीत म्हणून त्याने फिर्यादी व त्यांची पत्नी राजश्री नंदकुमार गार्डे यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्यांच्या पत्नीच्या गळयातील र.रु.१,६०,०००/- किंमतीचे २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे पदक व काळे मनी असलेले सोन्याचे पट्टीतील मंगळसुत्र जबरदस्तीने काढून नेले व त्यायोगे आरोपीने भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११९(१) अन्वयेचा गुन्हा केला? | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## **<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u> –**

५. अभियोगपक्षाने आरोपीविरुद्धचा गुन्हा सिध्द करण्यासाठी आरोपीने फिर्यादी व त्याची पत्नी राजश्री नंदकुमार गार्डे यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्याच्या पत्नीच्या गळयातील र.रु.१,६०,०००/- किंमतीचे २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे पदक व काळे मनी असलेले सोन्याचे पट्टीतील मंगळसुत्र जबरदस्तीने काढून

नेले इ. बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी एकूण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदवली आहे. पैकी साक्षीदार क्र.१ राजश्री नंदकुमार गार्डे यांची साक्ष नि.क्र.१४ वर नोंदविली. त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले की, आरोपी हा त्यांचा मुलगा असून फिर्यादी हे त्यांचे पती होते. दि.२३.०३.२०२५ रोजी काय घडले याबाबत त्यांना माहिती नसल्याचे सांगितले. त्यांचे मंगळसुत्र चोरीला गेले नसून त्या पाणी काढणेसाठी विहीरीजवळ गेले असताना पडून गहाळ झाले होते. सदरचे मंगळसुत्र त्यांना परत मिळाले असून आरोपीने चोरी केले नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदार अभियोग पक्षास मदत करीत नाही म्हणुन त्यांचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परंतु, उलटतपासामध्ये ही अभियोग पक्षास मदत होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल झाला नाही. त्यांच्या तक्रारीतील अधोरेखांकित भाग ‘अ’ हा त्यांच्या माहितीचा नसल्याचे सांगितले.

७. अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. २ नितीन बापुराव जाधव हे पंच साक्षीदार असून त्यांची साक्ष नि.क्र.१६ वर नोंदविली. त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले की, दि.२५.०३.२०२५ रोजी पोलिसांनी त्यांच्या दोन कागदावर सहया घेतल्या होत्या. घटनास्थळ पंचनामा, निवेदन पंचनामा व जप्ती पंचनामा यावरील त्यांच्या सही व्यतिरिक्त इतर मजकूर त्यांनी नाकारला आहे. सदर साक्षीदार अभियोग पक्षास मदत करीत नाही म्हणुन त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परंतु, उलटतपासामध्ये ही अभियोग पक्षास मदत होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल झाला नाही. त्याच्या जबाबातील अधोरेखांकित भाग ‘अ’ हा त्याच्या माहितीचा नसल्याचे सांगितले.

८. संचिकेवरील दाखल सर्व तोंडी व कागदोपत्री पुराव्यांचे अवलोकन केले. अभियोगपक्षातर्फे सहा. अभियोक्ता श्रीमती वायकर तसेच आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. अभंग यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणात राजश्री गार्डे ही महत्त्वपुर्ण साक्षीदार होती व तिची साक्ष ही घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून नोंदवलेली आहे. परंतु, सदर साक्षीदाराने तिच्या साक्षीमध्ये आरोपीने तिला व तिच्या पतीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली होती व तिचे मंगळसुत्र जबरदस्तीने काढून नेले होते असे काही सांगितलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन आरोपीविरुद्धचे दोषारोप सिद्ध होत नाहीत. प्रस्तुत घटनेतील फिर्यादी नंदकुमार गार्डे हा साक्षीदार क्र.१ चा पती असून तो मयत झाला असल्याचे साक्षीदाराने तिच्या साक्षीत सांगितलेले आहे. प्रस्तुत घटनेमध्ये फिर्यादी व सा.क्र.१ हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होते. परंतु, सदर साक्षीदार क्र.१ ने आरोपीविरुद्ध काहीही सांगितले नाही. अभियोगपक्षाने पंच साक्षीदार नितीन जाधव याची साक्ष नि.क्र.१६ वर नोंदवली आहे. त्याने त्याच्या साक्षीमध्ये जप्ती व निवेदन पंचनामा यातील मजकुर त्याला माहित नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे सदर जप्ती व निवेदन पंचनामा सिद्ध झालेला नाही.

९. सबब, संचिकेवरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपीवरील दोषारोप सिद्ध होतील असा कोणताही पुरावा संचिकेवर आलेला नाही. साक्षीदार क्र.१ ने घटनेबाबत पुर्णपणे अनभिज्ञता दाखविली आहे. अशा परिस्थितीत फिर्यादमध्ये नमुद असणा–या घटनेची सत्यता आणि त्यामधील आरोपीचा सहभाग याबाबत शंका निर्माण होते. सबब, अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द केलेले नाहीत, या निष्कर्षापर्यंत मी पोहचलो आहे. त्यामुळे, सबळ, पुरेशा व विश्वासार्ह

पुराव्या अभावी आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होणार आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीता –**

१०. वरील मुद्दयाचे नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपीवर ठेवण्यात आलेल्या आरोपामधून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.२ चे उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी विवेक नंदकुमार गार्डे याची भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११९(१) या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करुन त्यास खुले करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र सादर करावे.

४. जप्त मुद्देमाल एक २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे पदक व काळे मनी असलेले सोन्याचे पट्टीतील मंगळसुत्र हे मुळ मालकास यापुर्वी सुपूर्तनाम्यावर अंतरिम ताब्यात देण्यात आलेले होते, सदरचा सुपूर्तनामा हा अपील कालावधीनंतर रद्द करण्यात येवून त्याचा कायमस्वरुपी ताबा मुळ मालकाकडे देण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.)

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2026.08.12 17:49:47 +0530

फलटण. (ए.एस.साटोटे)

दि.१२.०८.२०२६ ३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण